प्रेस नोट

दि.०३/०२/२०१९

## जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटना आनंद लुटता यावा याकरीता आंतरराष्ट्रीय व महत्वाचे चेकपोस्ट वगळुन इतर चेकपोस्ट बंद केलेबाबत

सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकुण १९ चेकपोस्ट व दोन राज्यांना जोडणारे बांदा(इंन्सुली), सांवतवाडी(सातार्डा,आरोंदा) व वेंगुर्ला(रेडी) असे आंतरराज्य जोडणारे चेकपोस्ट आहेत. सध्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वत्र सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविण्याची प्रक्रिया संपुर्ण होत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असल्याने सध्या जिल्ह्यात पर्यटक येण्याची सुरवात झालेली असुन पर्यटकांचा प्रवास सुखकर व्हावा तसेच सध्या जिल्ह्यात रस्ता सुरक्षा अभियान २०१९ हे राबविण्यात येत असल्याने वाहतुक पोलीस व स्थानिक पोलीस मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उपलब्ध होणार आहेत म्हणुन पर्यटकांना वारंवार पोलीसांकडुन चेकिंग करुन अडथळा करुन त्यांना पर्यटनाचा आनंद लुटता यावा त्या दृष्टीने जिल्ह्यातील अनावश्यक चेकपोस्ट बंद करण्यात आलेल्या आहे.

जिल्हयातील प्रवेशाचे ठिकाणी व अन्य महत्वाचे ठिकाणी तसेच गर्दीचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वयीत होत आहे त्यामुळे कमीत कमी पोलीस मनुष्यबळाचा वापर करुन चांगले काम करण्याकडे लक्ष देण्यात येणार आहे.

सध्या लोकसभा/विधानसभा २०१९ चे निवडणुक होणार असुन निवडणुकिकामी पोलीस ठाण्यात अधिक मनुष्यबळ ठेवणे गरजेचे असल्याने जिल्ह्यात कोठेही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व पोलीस ठाण्यात तसेच मुख्यालयात राखीव मनुष्यबळ ठेवणे गरजेचे आहे. अशा बंद केलेल्या चेकपोस्ट मधील नेमण्यात येणार कर्मचारी यांना निवडणुकिचे दृष्टीने विशेष काम देण्यात येणार असुन त्यानुसार निवडणुक प्रक्रियेमध्ये सुलभता येण्यास मदत होणार आहे.

जिल्ह्याच्या हद्दीत अवैद्य धंदे व वाहतुक सुरु होवु नये म्हणुन बांदा(इंन्सुली), सांवतवाडी(सातार्डा,आरोंदा,आंबोली), वेंगुर्ला(रेडी), दोडामार्ग येथील विजघर अशा चेकपोस्टवर जास्तीतजास्त मनुष्यबळ नेमुन प्रभावीपणे वाहनाची व मनुष्याची तपासणी करण्यात येणार आहे.

(दिक्षीत गेडाम)
पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग